**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२**

---

**क्र.टिपीएस-१८२१/प्र.क्र.१०३/२०२१/नवि-१३** **दि.०२/०८/२०२१**

**प्रस्तावना :-** शासनाने दि.०२.१२.२०२० रोजीच्या अधिसूचनेद्वारे मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर केली असून ती दि.०३.१२.२०२० पासून अंमलात आली आहे. सदर निययावली उक्त अधिसूचनेत नमूद क्षेत्र वगळता राज्यातील सर्व प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्राकरिता लागु आहे. सदर नियमावलीतील विनियम २.२.१४(ii) हा Fire Infrastructure Charges बाबत असून यामध्ये These charges shall be decided by the Government from time to time अशी तरतूद आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ हा महाराष्ट्र राज्यासाठी दि.०६.१२.२००८ पासून लागु करण्यात आला आहे. या अधिनियमामध्ये अंग्निशमन सेवेच्या अनुषंगाने वसूल करावयाचे शुल्क, त्यामध्ये वाढ अथवा घट करणे, असे शुल्क स्वतंत्र निधीमध्ये ठेऊन त्याचा विनियोग कशाप्रकारे करावा याबाबत सविस्तर तरतुदी करण्यात आल्या आहेत.

उक्त अधिनियम संपूर्ण राज्यासाठी लागू झाला असल्याने त्यातील तरतुदी व त्यानुसार आकारावयाचे शुल्काची मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये Fire Infrastructure Charges बाबत करण्यात आलेल्या तरतुदीमधे पुनरावृत्ती होत असल्याचे शासनाच्या निर्दशनास आले असल्याने मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम २.२.१४(ii) मधील तरतुदीच्या अनुषंगाने आकारावयाच्या Fire Infrastructure Charges बाबत खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

***आदेश***

मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम २.२.१४(ii) मधील तरतुदीनुसार Fire Infrastructure Charges ची आकारणी वेगळ्याने करण्याची आवश्यकता नाही. मात्र महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसुरक्षा अधिनियम, २००६ मधील तरतुदींनुसार आवश्यक ती फी / शूल्क आकारणी करण्यात यावी व त्याचा विनियोग सदर अधिनियमातील तरतुदींनुसार करण्यात यावा.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32

**(किशोर गोखले)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उप मुख्यमंत्री महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

६. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

७. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

८. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

९. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०. संचालक (नगर रचना) तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

११. सह सचिव तथा सहसंचालक (नगर रचना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रति :-**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

/- सदर **आदेश** नगर रचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.

२) संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, मुंबई.

३) सर्व विभागीय सहसंचालक, नगर रचना.

४) सर्व विभागीय आयुक्त.

५) सर्व जिल्हाधिकारी.

६) आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका.

७) महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.

८) सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे.

९) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची शासकीय **आदेश** महाराष्ट्र शासनाच्या **असाधारण** राजपत्रामध्ये **राज्यस्तरावर** प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी १० प्रती नगर विकास विभागास व सर्व कार्यालयांना पाठवाव्यात.

१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण, कोल्हापूर.

११) सर्व नवनगर विकास प्राधिकरणे.

१२) सहायक संचालक, नगर रचना / नगर रचनाकार, नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग, सर्व शाखा कार्यालये.

१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हापरिषद.

१४) मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती)

१५) अवर सचिव, नवि-११/नवि-३०, कक्ष अधिकारी, नवि-९/नवि-१२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सोबतचे **आदेश** या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.

१७) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सदरचे **आदेश** शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.

१८) निवडनस्ती, कार्यासन (नवि-१३).

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32

*******